# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.01.2026** **वारःशनिवार**

---

1. 2026-27 या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प उद्या म्हणजेच 1 फेब्रुवारी रोजी संसदेत सादर होणार, अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार
2. भारत आणि अरब देशांची दुसरी बैठक आज नवी दिल्लीत होणार
3. राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी आज बैठक आणि
4. भारत आणि न्यूझीलंड संघांमधील 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील अंतिम सामना आज तिरुवनंतपुरम इथं होणार

**अर्थसंकल्प**

2026-27 या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प उद्या म्हणजेच 1 फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. लोकसभेनंतर राज्यसभेत अर्थसंकल्प मांडला जाईल. उद्या लोकसभेत निर्मला सितारामन यांच अर्थसंकल्पावरील भाषण झाल्यावर, अर्थसंकल्पाची प्रत मोबाईल ॲप आणि संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्थसंकल्पानंतर अर्थमंत्री निर्मला सितारामन या देशातल्या विविध भागातून आलेल्या निवडक 30 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तत्पूर्वी देशाच्या कारभारातील अत्यंत महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या अर्थसंकल्पाच लोकसभेत सादरीकरण अनुभवण्याची संधी या विद्यार्थ्यांना लोकसभेत प्रत्यक्ष उपस्थित राहून मिळणार आहे. त्यानंतर हे विद्यार्थी अर्थ मंत्र्यालयात जाऊन तिथल्या कामकाजाची माहिती घेणार आहेत.

दरम्यान, अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर, अर्थमंत्री निर्मला सितरामन यांनी विविध क्षेत्रातील तज्ञांची बैठक घेऊन त्यांच्याशी अनेक मुद्यांवर चर्चा केली. यामध्ये अर्थ तज्ञ, व्यापारी महासंघाचे प्रतिनिधि, शिक्षण, आरोग्य उद्योग, गुंतवणूक बाजार आदि क्षेत्रातील प्रतिनिधींचा समावेश होता. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनीही अर्थमंत्री निर्मला सितारामन यांची काल भेट घेतली आणि त्यांना कृषी आणि ग्रामीण विकास संदर्भातील अनेक महत्वपूर्ण मुद्द्यावर चर्चा करून अर्थसंकल्पासाठी विविध शिफारसी असलेला अहवाल सोपवला. याबरोबरच अर्थसंकल्पासाठी यावर्षी देशभरातून नागरिक आणि युवा पिढी च्या सूचना अर्थ मंत्रालयाने मागवल्या होत्या त्याच प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**बैठक**

भारत आणि अरब देशांची दुसरी बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. या बैठकीची सह अध्यक्षता भारत आणि संयुक्त अरब अमिराती करणार आहेत. भारत प्रथमच या बैठकीच यजमानपद भूषवित असूंन, नवी दिल्लीत त्याच आयोजन करत आहे. या बैठकीत अरब लीग मधील 22 देश सहभागी होत असूंन या देशांचे परराष्ट्रमंत्री आणि अरब लीगचे महासचिव त्याला उपस्थित राहतील. अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची ही बैठक 10 वर्षानी होत असूंन यापूर्वी 2016 मध्ये ही बैठक झाली होती, त्यामध्ये अर्थव्यवस्था, ऊर्जा, शिक्षण, प्रसारमाध्यमे आणि संस्कृती आशा पाच क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच ध्येय ठेवण्यात आल होत. दीर्घ काळानंतर होणाऱ्या या बैठकीमुळे भारत आणि अरब देशांमधील परस्पर संबंध आणि सहकार्य अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काल नवीदिल्लीत परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी भारत- अरब वाणिज्य उद्योग आणि कृषी कार्यालयाच उद्घाटन केल. भारत आणि अरब देशात व्यापार संबंध अधिक मजबूत होण्यासाठी विविध क्षेत्रात आर्थिक गुंतवणूक

आणि सहकार्य करार करण्याची भरपूर शक्यता असल्याच सांगून राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी दोन्ही देशांच्या या समन्वय कक्षाला शुभेच्छा दिल्या.

**एस जयशंकर**

भारताचे परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत अरब देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. त्याचा उद्देश द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याबरोबर पश्चिम आशिया मधील परिस्थिती समजून घेण हा होता एस जयशंकर यांनी काल कोमोरोस, लीबिया, सोमालिया आणि पॅलेस्टाईनचे परराष्ट्रमंत्री तसच अरब लीगके महासचिव अहमद अबुल घीत यांच्याशी ही चर्चा केली.

**पंतप्रधान-व्हेनेझुएला**

भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील द्विपक्षीय भागीदारी आणखी वाढवण्याबाबत काल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हेनेझुएलाच्या हंगामी अध्यक्ष डेल्सी रॉड्रीग्ज यांनी सहमती दर्शवली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये दूरध्वनीद्वारे झालेल्या संभाषणात परस्पर हिताच्या विविध क्षेत्रिय आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे. दक्षिण गोलार्धाच्या भवितव्याच्या दृष्टीनं दोन्ही देशांचं निकटचं सहकार्य महत्त्वाचं असल्याच्या मुद्द्यावर चर्चेत भर देण्यात आला.

**यूएन आर्थिक संकट**

संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांनी आपले नियमित शुल्क जमा केले नसल्यामुळे ही जागतिक संस्था आर्थिक संकटात सापडण्याचा धोका असल्याचं संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांनी म्हटलं आहे. याबाबतचं पत्र त्यांनी सर्व सदस्य देशांना पाठवलं आहे. सदस्य देशांनी नियमित शुल्क जमा केलं नाही तर येत्या जुलै महिन्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या नियमित कामकाजाचा खर्च करणं देखील अशक्य होईल असं त्यांनी पत्रात नमूद केलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक निधीतील सर्वात मोठा भागीदार देश असलेल्या अमेरिकेनं गेल्या वर्षीचं अनिवार्य शुल्क भरलेलं नाही त्यामुळे हे आर्थिक संकट उद्भवलं आहे.

**वैष्णव**

येत्या 16 ते 20 फेब्रुवारीदरम्यान नवी दिल्ली इथं होणारी India-AI Impact Summit 2026 ही जगातली सर्वात मोठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषद ठरेल, असा विश्वास केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला आहे. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या शिखर परिषदेत 100 पेक्षा जास्त कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी होत आहेत. विकसित भरताच स्वप्न साकार करण्यामध्ये यापुढील काळात सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर महत्वपूर्ण ठरणार आहे अस अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं.

**भुजबळ**

राष्ट्रवादी काँग्रेसनं आज विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे. त्यात विधीमंडळ पक्षनेत्याची निवड होईल, अशी माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी काल दिली. या बैठकीत विधिमंडळ पक्ष नेता निवडीचा निर्णय झाला, तर तातडीनं शपथविधी होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद, तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सर्वच प्रसारमाध्यमातून चर्चा सुरू आहेत, या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. विधिमंडळ नेते पदी सुनेत्रा पवार यांची निवड व्हावी, अशी अनेकांची भावना असून, ही मागणी रास्त असल्याचं छगन भुजबळ यांनी सांगितलं. दरम्यान, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे.

**पुरस्कार**

प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथानं मिळवलेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार काल नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. राज्याची संस्कृती आणि परंपरांचं

दिमाखदार दर्शन घडवणारा हा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित होता. या चित्ररथाचा विषय केवळ धार्मिक नसून तो आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर आधारित होता. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवातून झालेली समाजजागृती, तसंच पर्यावरणपूरक मूर्तींच्या माध्यमातून निर्माण होणारी नवी अर्थव्यवस्था या चित्ररथात प्रभावीपणे दाखवण्यात आली होती. या स्पर्धेत जम्मू-काश्मीरच्या चित्ररथाला द्वितीय, तर केरळच्या चित्ररथाला तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

**अमेरिका इराण वाटाघाटी**

अमेरिकेची संभाव्य लष्करी कारवाई टाळण्यासाठी इराण वाटाघाटीला तयार झाला असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराणची अमेरिकेसोबत करार करायची इच्छा आहे असं त्यांनी काल व्हाइट हाउसमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. तत्पूर्वी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी इराणची भूमिका स्पष्ट केली. इराण आपल्या संरक्षण सामर्थ्याशी कोणतीही तडजोड न करता, रास्त अटींवर अमेरिकेशी चर्चा करण्यास तयार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड संघांमधील 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज तिरुवनंतपुरम इथं होणार आहे. सायंकाळी 7 वाजता सामना सुरु होणार आहे. भारताने यापूर्वीच या मालिकेत विजयी आघाडी घेतली असून मालिकेचा शेवटदेखील विजयाने करण्याचा दोन्ही संघ प्रयत्न करतील. यानंतर 7 फेब्रुवारीपासून वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.